# १२ कासव

माझ्या घरासमोरच शंकराचे देऊळ आहे. देवळाच्या समोर नंदी व कासव पण आहे. देवळात येणारा प्रत्येक भाविक कासवाला, नंदीला व मग शंकराला नमस्कार करत असतो. या भक्तीचा मला बरेच वर्षे उलगडा होत नव्हता. परंतु परवाच महाशिवरात्रीला रेडियोवर कासवासंबंधी एक गोष्ट सांगितली. प्रथम गोष्टीकडेच वळतो.

एक दिवस भगवान शंकर इंद्राच्या दरबारात ऐतात. इंद्रदेव त्यांचे स्वागत करतात, आदरसत्कार करतात. त्यानंतर दरबारात करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करतात. दरबारातील नर्तकी नाच पेश करतात. इतर देव आपआपल्या कला सादर करतात. तरीसुद्धा भगवान शंकराची कळी खुलत नाही. मग इंद्र सर्व प्राण्यांना बोलावतो. प्राणी आपआपल्या वैशिष्टाप्रमाणे कला पेश करतात. सर्वात शेवटी कासव येते. इंद्रदेव काळजीत पडतात की आतातरी शंकर प्रसन्न होतील का ? कासव सर्व प्राण्यांना युध्दाचे आवाहन करते. सर्व प्राणी हसतात. ते म्हणतात कि तुझ्याशी काय युध्द करायचे ? कासव म्हणते करून तर बघा. युध्दाला सुरवात होते. कासव चपळाईने स्वतःचे अंग आपल्या पाठीवरील कवचात दडवते. सर्व प्राणी एकापाठोपाठ पाठीवर हल्ला करतात. पण काहीच उपयोग होत नाही. सर्व प्राणी थकून जातात. भगवान शंकराला ही लढाई फारच आवडते. भगवान शंकर प्रसन्न होतात व सांगतात की आजपासून ह्या कासवाची जागा माझ्या देवळाच्या समोर असेल व मी प्रत्येक भाविकाची जो प्रथम कासवाला नमस्कार करून माझे दर्शन घेईल त्याची मनोकामना पूर्ण करीन.

गोष्ट इथेच संपते पण माझी विचार मालीका सुरू होते.

१. ही गोष्ट कधीच वाचनात कशी आली नाही ?

**2.** कासव जर स्वप्नात दिसले तर अतिश्रमाने यश व धन हाती लागते असे म्हणतात.

**3.** आपला कासवाचा विचार फक्त लहानपणी ससा व कासव या गोष्टीपुरताच मर्यादीत असतो.

४. कासव ह्या युध्दात जिंकते किंवा हरत नाही याचे प्रमुख कारण म्हणजे कासवाचे **Weak points /Weakness** इतर प्राणी ओळखू शकत नाहीत. कासवाचा पोटाकडला भाग नाजूक असतो व कासवाला जर उलटे पाडले तर त्याला चटकन सुलटे होता येत नाही. यावरून मला वेगळाच विचार सुचला. आपल्याला जर ह्या जीवन संभ्रमात यशस्वी व्हायचे असेल तर आपली बलस्थाने पूर्णपणे वापरली पाहिजेत. तसेच आपली नाजुक स्थाने (Weakness) जगापासून लपवता आली पाहिजेत. आपण जर का हे करू शकलो तर आपला पराजय सहजासहजी करणे दुस–याला शक्य होणार नाही.

५. कासवाच्या गतीने जरी आपण प्रगती केली / झाली (सर्वच बाबतीत) तरी सुध्दा आपण खूप दूरचा पल्ला गाठू शकू. पण प्रत्येकाला सशासारखे पळावेसे वाटते. ससा आळसाने बागेत झोपला. तर आजचा माणूस जीवनाच्या

रनवेवर पळून पळून थकतो व ज्याच्यासाठी तो पळत असतो तो हेतूच नाहीसा होतो. कारण रेषेपलिकडे पोचल्यावर मिळालेल्या पैशाची , सुखाची मजा घ्यावयास त्याच्याकडे शक्तीच राहत नाही. त्यामुळेच आपण आपला वेग कासवापेक्षा जास्त परंतु सशापेक्षा कमी ठेवला तर आयुष्यातील बरीच मजा / सुख अनुभवता येईल.

लेख संपविताना पटकन आठवण झाली ती नंदिची. भगवान शंकराचे वाहन. प्रत्येक भाविक कासवाला नमस्कार केल्यानंतर नंदीच्या शिंगावर हाताची दोन बोटे टेकवून, डोके वाकवून दोन बोटांच्यामधून शंकराचे दर्शन घेतो. याची गोष्ट माझ्या वाचनात नाही. काय भाविकहो आपल्याला माहित आहे का याची गोष्ट?

जरूर कळवा हं!!!